पुढारी

# विद्यापीठात घरगुती कचरा व्यवस्थापन अभ्यासक्रम

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठातील लोकविकास केंद्रामार्फत घरगुती कचरा व्यवस्थापन आणि किचन गार्डनिंग हा नि:शुल्क अभ्यासक्रम सुरू झाला आहे. अभ्यासक्रम चार महिने कालावधीचा असून प्रत्येक गुरुवारी दुपारी १ ते ३ या कालावधीत शिकवला जातो. यामध्ये कंपोस्टिंगचे विविध प्रकार, किचन गार्डनमधील भाज्या फुले व फळे यांची लागवड तसेच सेंद्रिय खते व औषधे यांचा समावेश असतो.

My Kolhapur Edition
9 July, 2019 Page No. 8
Powered by : erelego.com




शिवाजी विद्यापीठाच्या राष्ट्रीय सेवा योजनेच्या विद्यार्थ्यांसह निर्मल वारी...हरित वारी उपक्रमात सहभागी झालेले कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे, डॉ. आर. व्ही. गुरव, अमित कुलकर्णी, डॉ. डी. के. गायकवाड आदी.

# विद्यापीठातर्फे निर्मल वारी... हरित वारी

कोल्हापूर टाइम्स टीम

शिवाजी विद्यापीठाच्या राष्ट्रीय सेवा योजनेच्या स्वयंसेवकांनी कार्यक्षेत्रात आषाढी वारीचे स्वागत करण्याबरोबरच 'निर्मल वारी, हरित वारी' अभियान राबविण्याचा निर्धार केला आहे. वारीसमवेत चालताना वारकऱ्यांच्या सेवेबरोबरच हे स्वयंसेवक या अभियानाअंतर्गत कृती कार्यक्रमही राबवित आहेत. सातारा जिल्ह्यातील निरा येथे आषाढी वारीचे आगमन होताच कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांनी श्री ज्ञानेश्वर माऊलींच्या पालखीचे आणि वारकऱ्यांचे स्वागत केले. राष्ट्रीय सेवा योजनेच्या सुमारे एक हजार स्वयंसेवकांसमवेत कुलगुरू डॉ. शिंदे निरा ते लोणंद या साधारण दहा किलोमीटरच्या दिंडीत सहभागी झाले.

गतवर्षीप्रमाणे यंदाही निर्मल वारी अभियानांतर्गत हे स्वयंसेवक स्वच्छता मोहीम राबविणार आहेत. त्या जोडीला यंदा वारीच्या मार्गावर ठिकठिकाणी वृक्षारोपण करून 'हरित वारी' अभियानही राबविणार आहेत.

श्री ज्ञानेश्वर माऊलींच्या पालखीच्या स्वागतापूर्वी कुलगुरू डॉ. शिंदे यांनी उपस्थित स्वयंसेवकांशी संवाद साधला.

यावेळी कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर, डॉ. आर.व्ही. गुरव, अमित कुलकर्णी, डॉ. डी.के. गायकवाड, प्राचार्य डॉ. डी.आर. मोरे आदी उपस्थित होते.

# सामाजिक परिषदेसाठी कराडे तैवानला रवाना



डॉ. जगन कराडे

कोल्हापूर, ता. ८ : एशियन असोसिएशन ऑफ सोशल सायकॉलॉजीतर्फे (एएएसपी, ताइपै) १० ते १३ जुलैदरम्यान तैवान येथे होणाऱ्या आंतरराष्ट्रीय सामाजिक मानसशास्त्र परिषदेत सहभागी होण्यासाठी शिवाजी विद्यापीठातील समाजशास्त्र अधिविभागप्रमुख डॉ. जगन कराडे रवाना झाले आहेत. डॉ. कराडे 'मायग्रेशन अँड अनऑर्गनाईज्ड सेक्टर इन इंडिया : ए केस स्टडी ऑफ कोल्हापूर सिटी' या विषयावर शोधनिबंध सादर करतील. त्यांचे राष्ट्रीय आणि आंतराराष्ट्रीय पातळीवर ११ संशोधनात्मक ग्रंथ प्रकाशित झाले आहेत. यातील दोन ग्रंथ केंब्रीज स्कॉलर पब्लिकेशन, लंडन येथून प्रकाशित झाले आहेत. त्याचबरोबर त्यांनी राज्य पातळीवर कार्यरत असणाऱ्या मराठी समाजशास्त्र परिषदेचे अध्यक्षस्थान भूषविले आहे. इंडियन सोशिओलॉजिकल सोसायटी या संस्थेच्या व्यवस्थापन समितीवर ते सदस्य म्हणून कार्यरत आहेत.

# तैवान परिषदेसाठी डॉ. कराडे रवाना



कोल्हापूर : तैपेई (तैवान) येथे होणाऱ्या आंतरराष्ट्रीय परिषदेसाठी शिवाजी विद्यापीठाच्या समाजशास्त्र विभागाचे प्रमुख प्रा. डॉ. जगन कराडे रवाना झाले. १० ते १३ जुलैअखेर परिषद होणार आहे. एशियन असोसिएशन ऑफ सोशल सायकॉलॉजीतर्फे आंतरराष्ट्रीय सामाजिक, मानसशास्त्र परिषद होणार आहे. या परिषदेत डॉ. कराडे 'मायग्रेशन ॲण्ड अनऑर्गनायझ सेक्टर इन इंडिया : ए केस स्टडी ऑफ कोल्हापूर सिटी', या विषयावर शोधनिबंध सादर करणार आहेत. डॉ. कराडे यांचे अकरा ग्रंथ प्रकाशित झाले असून, दोन ग्रंथ लंडनच्या केंब्रीज स्कॉलर पब्लिकेशनतर्फे प्रकाशित झाले आहेत. मराठी समाजशास्त्र परिषदेचे अध्यक्ष, इंडियन सोशिऑलॉजिकल सोसायटीचे व्यवस्थापन समिती सदस्य आणि टोरँटो येथील आंतरराष्ट्रीय परिषदेतील संशोधन समितीच्या कार्यकारिणी सदस्यपदीही प्रा. कराडे कार्यरत आहेत.

## 'लोकविकास' मार्फत 'किचन गार्डनिंग' अभ्यासक्रम

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठातील लोकविकास केंद्रामार्फत 'घरगुती कचरा व्यवस्थापन आणि किचन गार्डनिंग' हा चार महिने कालावधीचा अभ्यासक्रम प्रत्येक गुरुवारी दुपारी एक ते तीन या कालावधीत शिकविला जातो. त्यामध्ये कंपोस्टिंगचे विविध प्रकार, किचन गार्डनमधील भाज्या, फुले व फळे यांची लागवड, सेंद्रिय खते आणि औषधे देण्याचे प्रमाण याबाबत मार्गदर्शन केले जाते. हा अभ्यासक्रम सुरु झाला असून, तो विनाशुल्क आहे.